प्रेस नोट दिनांक २२/०९/२०१९

| | |
|---|---|
| ॲसीबी | रत्नागिरी युनिट |
| आरोपी लोकसेवक | १) श्री. अशोक विठ्ठल नाचणकर, वय-५६ वर्षे<br>तात्कालीन भांडारपाल, सार्वजनिक बांधकाम विभाग, दक्षिण रत्नागिरी<br>२) सौ. अर्चना अशोक नाचणकर, वय-५२ वर्षे,<br>३) श्रीमती संपदा अशोक नाचणकर, वय- ३२ वर्षे<br>४) श्रीमती अंकिता अशोक नाचणकर, वय-२९ वर्षे,<br>सर्व रा. ५३२, पितृछाया, आदर्शनगर, मिरजोळे, ता.जि. रत्नागिरी |
| घटनेचे ठिकाण | दिनांक १५/०३/२००३ ते ०३/०३/२०१५ या कालावधीमध्ये रत्नागिरी शहर व आजुबाजुचे परिसरामध्ये |
| अपसंपदा रक्कम | ज्ञात उत्पन्नापेक्षा जास्त एकुण रू. १,७३,५६,८५२/- एवढी अपसंपदा म्हणजेच १०९.२६ % अपसंपदा संपदित केली |
| थोडक्यात हकिगत | श्री. अशोक विठ्ठल नाचणकर, वय-५६ वर्षे तात्कालीन भांडारपाल, सार्वजनिक बांधकाम विभाग, दक्षिण रत्नागिरी तसेच त्यांची पत्नी सौ. अर्चना अशोक नाचणकर, वय-५२ वर्षे, मुलगी श्रीमती संपदा अशोक नाचणकर, वय- ३२ वर्षे व मुलगी श्रीमती अंकिता अशोक नाचणकर, वय-२९ वर्षे, सर्व रा. ५३२, पितृछाया, आदर्शनगर, मिरजोळे, ता.जि. रत्नागिरी, यांचेकडे रत्नागिरी शहर व आजुबाजुचे परिसरामध्ये दि. १५/०३/२००३ ते ०३/०३/२०१५ या कालावधीमध्ये असलेले ज्ञात उत्पन्न, खर्च व मालमत्ता विचारात घेण्यात येवून, त्यांच्या ताब्यात ज्ञात उत्पन्नापेक्षा जास्त एकुण रू. १,७३,५६,८५२/- एवढी अपसंपदा म्हणजेच १०९.२६ % अपसंपदा संपदित केली असल्याचे स्पष्ट झाले आहे. त्याबाबतचा समाधानकारक खुलासा सादर करणेसाठी चौकशीकामी वेळोवेळी गैरअर्जदार अशोक नाचणकर व त्यांचे कुटुंबियांना समक्ष/रहाते पत्त्यावर व त्यांचे कार्यालय प्रमुखामार्फत पत्रव्यवहार करून देखील उपस्थित राहीले/राहील्या नाहीत. म्हणुन गैरअर्जदार श्री. अशोक विठ्ठल नाचणकर यांच्याविरूध्द गुन्हा घडला त्यावेळी प्रचलित असलेल्या कायदयाच्या तरतुदीनुसार भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम १९८८ चे कलम १३(१)(ई) सह १३(२) प्रमाणे (म्हणजेच भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम १९८८ चे दिनांक २६/०७/२०१८ चे दुरूस्ती अनुरूप कलम १३(ब) अन्वये) गुन्हा केल्याचे दिसुन येत आहे. तसेच गैरअर्जदार श्री. अशोक विठठल नाचणकर यांची पत्नी सौ. अर्चना अशोक नाचणकर, मुलगी श्रीमती संपदा नाचणकर व मुलगी श्रीमती अंकिता नाचणकर यांनी नमूद मालमत्ता ही अपसंपदा आहे हे माहित असूनही त्यांनी जाणीवपूर्वक त्यांचे स्वत:चे नावे मालमत्ता धारण करून कब्जात बाळगणे कामी श्री. अशोक विठठल नाचणकर यांना गुन्हा करण्यास प्रोत्साहन दिले म्हणुन गुन्हा घडला त्यावेळी प्रचलित असलेल्या कायदयाच्या तरतुदीनुसार भा.द.वि.स. चे कलम १०९ अन्वये (म्हणजेच भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम १९८८ चे दिनांक २६/०७/२०१८ चे दुरूस्ती अनुरूप कलम १२ अन्वये) गुन्हा केला आहे. म्हणून श्री. अशोक विठठल नाचणकर, वय-५६ वर्षे तसेच त्यांची पत्नी सौ. अर्चना अशोक नाचणकर, वय-५२ वर्षे, मुलगी श्रीमती संपदा अशोक नाचणकर, वय- ३२ |

| | |
|---|---|
| | वर्षे व मुलगी श्रीमती अंकिता अशोक नाचणकर, वय-२९ वर्षे, सर्व रा. ५३२, पितृछाया, आदर्शनगर, मिरजोळे, ता.जि. रत्नागिरी यांचे विरूध्द रत्नागिरी शहर पोलीस ठाणे गुन्हा रजि.नं. ३८२/२०१९ भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम १३(१) (ई) सह १३(२), (म्हणजेच भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम १९८८ चे दिनांक २६/०७/२०१८ चे दुरूस्ती अनुरूप कलम १३(ब) अन्वये) व भा. द. वि. कं. १०९ प्रमाणे (म्हणजेच भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम १९८८ चे दिनांक २६/०७/२०१८ चे दुरूस्ती अनुरूप कलम १२ अन्वये) दिनांक २२/०९/२०१९ रोजी १४.५४ वाजता गुन्हा दाखल करण्यात आला आहे. |

ॲन्टी करप्शन ब्युरो, रत्नागिरी तर्फे नागरिकांना आवाहन करण्यात येते की, कोणताही शासकिय अधिकारी/कर्मचारी किंवा त्याचे वतीने खाजगी इसम लाचेची मागणी करीत असतील तर कृपया ॲन्टी करप्शन ब्युरो, रत्नागिरी कार्यालयाशी खालील क्रमांकावर संपर्क साधावा.

**Toll Free No** :- 1064
**Telephone No** :- 02352/222893
**Office email** :- dyspacbratnagiri@mahapolice.gov.in
**Website** :- www.acbmaharastra.gov.in
**Mobile App** :- www.acbmaharastra.net
**Facebook Page** :- www.facebook.com/MaharastraACB

22/9/19
(नितीन भिकाजी विजयकर)
पोलीस उप अधिक्षक
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, रत्नागिरी